# प्रकरण पहिले

## विषय प्रवेश

# प्रकरण पहिले

## (१) ऐतिहासिक पार्श्वभूमी -

स्वा. वि.दा. सावरकर यांनी आपल्या अभिनव भारत पर्व काळात भारतीय राष्ट्रवादाची मांडणी केली. त्यांनी आपल्या विविधांगी लिखाणातून तत्कालीन परिस्थितीबाबत राष्ट्रवादी विचार मांडले. त्यांच्या मते हिंदुस्थानात इंग्रजी राज्य स्थापना झाल्याने हिंदुस्थानाची दुरावस्था झाली आहे. तेव्हा या परिस्थितीतून मुक्तता झाल्याशिवाय भारतीयांचे दैन्य संपणार नाही. म्हणून त्यांनी राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी क्रांतीनिष्ठ राष्ट्रवादी विचार मांडले.

प्रस्तुत प्रकरणात हिंदुस्थानात इंग्रज सत्तेची स्थापना, हिंदुस्थानावरील इंग्रज राजवटीचे झालेले दुष्परिणाम, आणि त्यातून निर्माण झालेल्या राजकीय चळवळीचे सावरकरप्रणित राष्ट्रवादी विचार यांची मांडणी करण्यात आलेली आहे.

### ब्रिटिश सत्तेचा उदय आणि विकास :

इ.स. १६०० मध्ये इंग्लंडची राणी पहिली ऐलिझाबेथ हिने ईस्ट इंडिया कंपनीला हिंदुस्थानात व्यापार करण्याची परवानगी दिली. ईस्ट इंडिया कंपनीने हिंदुस्थानात कलकत्ता, मुंबई, मद्रास, मच्छलीपट्टण, सुरत इत्यादी ठिकाणी व्यापारासाठी वखारी स्थापन केल्या. इ.स. १६०० ते १७५७ पर्यंत कंपनीने फक्त व्यापारविषयकच धोरण ठेवले. परंतु व्यापारात फायदा मिळू लागल्याने कंपनीची राजकीय महत्त्वाकांक्षा वाढली, आणि

यातूनच १७५७ च्या प्लासीच्या युध्दाने बंगाल प्रांत जिंकून घेऊन कंपनीने हिंदुस्थानात राजकीय सत्तेचा पाया घातला. त्यामुळे व्यापारासाठी आलेल्या ईस्ट इंडिया कंपनीचे राजकीय सत्तेत रूपांतर झाले. कंपनीने राजकीय सत्ता प्रस्थापित केल्यानंतर तिच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी ब्रिटिश संसदेने इ.स. १७७३ साली नियंत्रण कायदा केला. या कायद्याने कंपनीच्या ताब्यात आलेल्या सर्व प्रदेशांचे एकत्रिकरण करून त्यावर वॉरन हेस्टिंग्ज या गव्हर्नरची नियुक्ती केली. त्याने कंपनी सत्तेचे राजकीय विस्तारांचे धोरण आखले. त्याच्या कारकिर्दीत पहिले इंग्रज-मराठा युध्द होऊन मराठयांकडून ठाणे व साष्टी हा प्रदेश इंग्रजांना मिळाला. कॉर्नवालीसच्या कारकिर्दीत इंग्रजांना मलबार, कुर्ग, बारामहाल इत्यादी प्रदेश मिळाले. लॉर्ड वेलस्लीने मुत्सद्देगिरीने आणि प्रत्यक्ष युध्द करून हिंदुस्थानात कंपनी सत्तेचा मोठया प्रमाणात राजकीय विस्तार केला. लॉर्ड हेस्टिंग्जच्या काळात तिसरे व शेटचे इंग्रज-मराठा युध्द झाले. या युध्दात बाजीराव, नागपूरकर भोसले, होळकर यांचा पराभव होऊन इंग्रजांची राजकीय सत्ता विस्तारीत झाली. लॉर्ड हार्डिंग्जच्या काळात पहिले इंग्रज-शीख युध्द होऊन इंग्रजांना शीखांचा सतलज नदीच्या दक्षिणेकडील प्रदेश मिळाला. नंतरच्या काळात इंग्रजांनी आपली सत्ता स्थिर करून प्रशासकीय व्यवस्था उभी केली. यानंतर आलेल्या लॉर्ड उलहौसीने साम्राज्यवादी धोरणाचा पुरस्कार केला. त्याने नीति-अनीतीचा विचार न करता कंपनी सत्ता विस्तारीत केली. "दत्तक वारस नामंजूर" या तत्वानुसार सातारा, नागपूर, झाशी, संबळपूर, जैतपूर, उदयपूर इत्यादी राज्ये खालसा करून ती कंपनी राज्यात विलीन केली.[१] तैनाती फौजेच्या खर्चापोटी निजामाकडून वऱ्हाड प्रांत घेतला. बाजीरावाच्या मृत्यूनंतर दत्तक पुत्र नानासाहेब यांची पेन्शन जप्त केली. कर्नाटकाच्या नबाबाच्या मृत्यूनंतर त्याचे राज्य खालसा केले. तंजावर राजाच्या मृत्यूनंतर त्याच्या वारसाची

जहागीरही जप्त केली. गैरकारभाराच्या नावाखाली अयोध्येचे राज्य खालसा केले. अशाप्रकारे विविध कारणे देऊन लॉर्ड डलहौसीने हिंदुस्थानातील अनेक राज्ये खालसा करुन कंपनी सत्तेचा राजकीय विस्तार फार मोठ्या प्रमाणात केला. यामुळे हिंदी राजेराजवाडे, उच्च वर्ग, सामान्य जनता यांचा इंग्रजांच्या न्यायबुध्दीवरील विश्वास कमी होऊ लागला. इंग्रजांच्या अन्यायी धोरणामुळे हिंदी जनतेस असंतोष निर्माण झाला. या असंतोषाचा उद्रेक १८५७ च्या स्वातंत्र्य युध्दात झाला. [२]

१८५७ चे स्वातंत्र्य युध्द :

इ.स. १७५७ च्या प्लासीच्या युध्दाने हिंदुस्थानात कंपनी सत्तेचा राजकीय पाया घातला गेला. कंपनी सत्तेने आर्थिक व राजकीय महत्त्वाकांक्षेने साम्राज्यविस्ताराचे धोरण आखले आणि इ.स. १७५७ ते इ.स.१८५७ या शंभर वर्षाच्या काळात संपूर्ण हिंदुस्थानात आपले साम्राज्य प्रस्थापित केले. या प्रदीर्घ काळात कंपनी सत्तेचा राजकीय विस्तार आणि प्रचार करताना, कंपनीने आपल्या स्वार्थासाठी धोरणे आखली, साम्राज्यविस्तारासाठी व आर्थिक शोषणासाठी जे प्रयत्न केले, जो अट्टाहास केला त्या सर्वांचा परिणाम म्हणजे "१८५७ चे स्वातंत्र्य युध्द" होय. राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि लष्करी कारणांमुळे हिंदुस्थानातील सर्व जनतेने १८५७ साली कंपनी सत्तेविरुध्द स्वातंत्र्य युध्द करुन कंपनी सत्तेचा शेवट केला. या युध्दाविषयी स्वा. सावरकर म्हणतात की, "१८५७ चा उठाव हा स्वातंत्र्य संग्राम असून यात कंपनी सत्ता उलथून टाकण्यासाठी सर्व हिंदी जनता एकत्र आली होती. स्वराज्य व सुराज्यासाठी दिलेला हा महान लढा होय. [३]

१८५७ च्या स्वातंत्र्य युध्दात इंग्रजांनी हिंदी जनतेचा पाडाव केला. परंतु या युध्दाचे इंग्रज राजवटीवर फार मोठे परिणाम झाले. या स्वातंत्र्य

लढयात हिंदुस्थानातील सर्व जनतेने स्वधर्म व स्वराज्यासाठी शस्त्राचा वापर करून कंपनी सत्ता उलथून टाकण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे या लढयाचा स्वा. सावरकरांच्या जीवनावर फार मोठा प्रभाव पडला. या स्वातंत्र्य लढयात हिंदुस्थानातील हिंदु-मुस्लीम अशा सर्वच हिंदी जनतेने प्रथमच एकदिलाने कंपनी सत्तेविरूध्द सशस्त्र संघर्ष केला. दुसरा महत्त्वाचा राजकीय परिणाम म्हणजे या युध्दाने कंपनी सत्ता संपुष्टात आली, आणि त्याऐवजी ब्रिटिश संसदेची आणि राणी व्हिक्टोरियाची सत्ता हिंदुस्थानात स्थापन झाली. १८५७ चे स्वातंत्र्ययुध्द म्हणजे हिंदुस्थानची ऐक्याच्या, स्वातंत्र्याच्या व जागृत जन-शक्तीच्या दिशेने कितपत प्रगती झाली आहे हे पारखून पाहण्याची एक कसोटीच होती. [४]

### (२) भारतावरील इंग्रजी राजवटीचे दुष्परिणाम :

हिंदुस्थानावर इंग्रजांचे राज्य स्थापन झाल्यानंतर त्यांच्या अन्यायी, स्वार्थी, जुलमी, दडपशाही राजवटीने हिंदी जनतेची मोठया प्रमाणात धूळ-धाण उडाली. इंग्रजी राजवटीचे हिंदुस्थानावर अनेक दुष्परिणाम घडून आले. ते पुढीलप्रमाणे -

### १) भारतीय स्वातंत्र्याचा नाश :

व्यापारासाठी आलेल्या इंग्रजांनी १७५७ च्या प्लासीच्या युध्दाने भारतात राजकीय सत्तेचा पाया घातला. नंतर साम्राज्यविस्तारासाठी भारतीयांत फूट पाडून, अनेक युध्दे करून भारताचा बराच प्रदेश जिंकला. लॉर्ड डलहौसीने तर दत्तक वारस नामंजूर तत्वानुसार सातारा, नागपूर, झाशी, संबलपूर, जैतपूर, उदयपूर इत्यादी राज्ये खालसा केली. तैनाती फौजेच्या

खर्चापोटी निजामाकडून व-हाड प्रांत घेतला. गैरकारभाराच्या नावाखाली अयोध्येचे राज्य खालसा केले. अशाप्रकारे विविध मार्गाने इंग्रजांनी संपूर्ण भारतावर आपली राजवट प्रस्थापित केली. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्याचा नाश घडून आला.

## २) भारतीय जनतेचा तेजोभंग :

भारतातील इंग्रजी राजवटीची स्थापना हे ईश्वरी वरदान आहे. भारतीयांच्या कल्याणासाठी व सर्वांगीण विकासासाठी परमेश्वरानेच इंग्रजांना भारतात धाडले आहे. इंग्रज लोक न्यायी आहेत, त्यामुळे ते भारताचा सर्वांगिण विकास घडवून आणतील. देशाचा विकास झाल्यानंतर ते भारतीयांना स्वातंत्र्य देतील आणि स्वत:हून या देशातून आपल्या मायदेशी जातील अशी भावना काही भारतीयांची झाली होती. परंतु या राजवटीत इंग्रजांची फोडा आणि झोडाची कुटिल नीती, अधिकारी वर्गाची उर्मट व उद्दाम प्रवृत्ती, उच्च - नीच भेदभाव, अन्याय, जुलूम दडपशाही, आर्थिक शोषण आणि पिळवणूक पाहता इंग्रज राजवटीबद्दलचा भारतीयांचा आशाभंग झाला. त्यातूनच इंग्रज राजवटीबद्दल भारतीयांत असंतोषाची भावना वाढून राष्ट्रीय स्वातंत्र्याची भावना वाढीस लागली.

## ३) भारतीयांवर ख्रिस्ती धर्माचे आक्रमण :

इंग्रजांनी साम्राज्यविस्ताराबरोबरच ख्रिस्ती धर्म प्रसाराचेही धोरण आखले होते. ख्रिस्ती धर्म प्रसारासाठी इंग्रज राज्यकर्ते (लॉर्ड उलहौसी, कॅनिंग) अधिकारी वर्ग, मिशनरी यांनी सर्व परीने प्रयत्न केले. मिशनरी लोकांनी शाळा, चर्च, सभा इत्यादींतून ख्रिस्ती धर्माची शिकवण देऊन भारतीयांत धर्मांतर घडवून आणण्याचा सपाटा लावला. इंग्रजी राजवटीत धर्मांतर करून

ख्रिस्ती धर्म स्वीकारणाराला सरकारी नोकरी अथवा नोकरीत लगेच बढती दिली जात. तसेच वडीलार्जित संपत्तीवर वारसा हक्क कायदा केल्याने ख्रिस्ती धर्म प्रसाराला प्रोत्साहन दिले गेले. अशा प्रकारे भारतीयांच्या धार्मिक बाबतीत हस्तक्षेप करणार नाही असे वचन देणाऱ्या इंग्रजांनी भारतीयांच्या धार्मिक बाबतीत हस्तक्षेप केल्याने, आपल्या धर्मावर संकट आले आहे अशी भारतीयांची भावना झाली. यातूनच स्वधर्म रक्षणासाठी भारतीयांत इंग्रज राजवटीविषयी असंतोषाची भावना निर्माण झाली. [५]

४) <u>भारतीय शेतीची वाताहात :</u>

इंग्रजी राजवटीत भारतीय शेती व्यवसायाकडे दुर्लक्ष करण्यात आले. कायमधारा पध्दती, शेतसारावाढ, धान्याऐवजी पैशात शेतसारा वसूली यामुळे शेतकरी वर्ग कंगाल बनला. १८५० नंतर भारतात सुमारे २४ दुष्काळ पडले. या काळात सरकारने दुष्काळ निवारणाच्या दृष्टीने प्रयत्न केले नाहीत. उलट उपासमारीच्या वाटेला लागलेल्या शेतकऱ्यांकडून सक्तीने शेतसारा वसूल केला. शेतसारा भरण्यासाठी शेतकरी कर्जबाजारी बनला. अशाप्रकारे ब्रिटिश राजवटीत शेती व्यवसायाकडे दुर्लक्ष करण्यात आल्याने भारतीय शेतीची वाताहात झाली.

५) <u>भारतीय उद्योगधंद्याचा नाश :</u>

इंग्रजांनी व्यापाराबाबत आयात जास्त व निर्यात कमी करण्याचे धोरण स्वीकारल्याने भारतातून कच्चा माल मोठया प्रमाणात इंग्लंडला नेला जाऊ लागला. तेथे औद्योगिक क्रांतीमुळे मोठया प्रमाणात पक्का माल कार-

खान्यातून तयार केला जाऊ लागला. तो माल भारतात आयात करताना जकात कमी लावण्याचे धोरण सरकारने स्वीकारले. भारतात घरगुती उद्योगात तयार होणाऱ्या मालाचा दर्जा हीन व किंमती जास्त राहिल्या. विलायती माल सुबक व स्वस्त असल्याने त्याचा खप वाढला. मागणी वाढल्याने आयात वाढली. या पक्षपाती व स्वार्थी व्यापारी धोरणामुळे भारताची औद्योगिक प्रगती खुंटली. औद्योगिक उत्पादन स्पर्धेत भारतीय उद्योगधंदे टिकाव धरू शकले नाहीत. त्यामुळे देशी उद्योगधंदे बंद पडू लागले. अनेक लोक बेकार झाले. परिणामी भारतीय उद्योगधंद्याचा नाश घडून आला. [६]

६) <u>सतत येणारे दुष्काळ व त्यामुळे होणारी मनुष्यहानी :</u>

शेती हेच जीवन जगण्याचे एकमेव साधन उरल्यामुळे व भारतातील शेती ही पावसाच्या कृपेवर अवलंबून असल्यामुळे भारतीयांना इंग्रजी राजवटीत भयानक स्वरूपाच्या दुष्काळांना तोंड द्यावे लागले. इ.स. १८०० ते १९०० या शंभर वर्षांच्या काळात भारतात ३१ वेळा दुष्काळ पडला. या दुष्काळात अनेक लोक अन्नावाचून मृत्युमुखी पडले. १८५१ ते १९०० या पन्नास वर्षांच्या काळात सुमारे तीन कोटी दहा लक्ष लोक मृत्युमुखी पडले. ही मृत्यूची संख्या पाहिली असता दुष्काळातील भयंकर मनुष्यसंहाराची कल्पना येते. दुष्काळात लोकांना मदत करणे, प्रजेला वाचविणे हे आपले कर्तव्य आहे असे सरकारला वाटत नव्हते. त्यामुळे भारतीय जनतेत इंग्रज राजवटीविषयी भयंकर असंतोष वाटला.

७) <u>सुराज्यही दिले नाही :</u>

इंग्रज राज्यकर्ते न्यायी आहेत. ते भारतात कायद्याचे राज्य स्थापन *

करतील. देशात आर्थिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक सुधारणा करुन देशात सुराज्य निर्माण करतील अशी भारतीयांची अपेक्षा होती. परंतु सुराज्याच्या नावाखाली इंग्रजांनी अनेक जुलमी, अन्यायी कायदे करुन भारतीयांची सामाजिक, आर्थिक, राजकीय क्षेत्रात पिळवणूक केली. दुष्काळ, महापूर, रोगराई अशा संकट काळात मदत करण्याऐवजी अन्यायी व स्वार्थी धोरण आखले. भारतीयांना गुलामगिरीत टाकले. त्यामुळे इंग्रजांनी आमचे स्वराज्यच आमच्याकडून हिरावून घेतले आणि त्यांनी सुराज्यही दिले नाही. अशी भावना भारतीयांची बनली.

### (३) राजकीय परिस्थितीची प्रांतवार पहाणी :

१८५७ च्या स्वातंत्र्य युध्दानंतर १८६० ते १८८४ या काळात भारतात विविध प्रांतात राजकीय परिस्थिती कशी होती ? याबाबतचे वर्णन सावरकरांनी पुढील प्रमाणे केले आहे.

#### बंगाल :

स्वा. सावरकरांच्या मते, बंगाली जनतेने सुरुवातीपासूनच इंग्रज आक्रमणांस प्रभावी असा विरोध केला नाही. तेथील दुर्बल राजे आणि भ्याड जनता असल्याने इंग्रजांनी तो प्रदेश सहज जिंकून घेतला. बंगाली जनतेला प्रथम राजवटीतील अंदाधुंद, बेबंदशाही कमी व्हावी म्हणून इंग्रज राजवट हवीशी वाटू लागली. बंगाल प्रांतावर राजकीय वर्चस्व प्रास्थापित केल्यानंतर इंग्रजांनी राजकीय व्यवहाराची गरज भागविण्यासाठी इंग्रजी शिक्षण सुरु केले. इंग्रजी शिक्षणाने लहान-मोठ्या नोकऱ्या मिळू लागल्याने शाळा-कॉलेजांतून इंग्रजी शिक्षण घेणाऱ्यांची संख्या वाढू लागली. त्यामुळे बंगाल प्रांतात इंग्रजी

शिक्षितांचाएक नवा वर्ग उदयास आला. हा वर्ग बुध्दिवंत असल्याने त्याच्याकडे समाजाचे नेतृत्व आले. इंग्रजांनाही तेच हवे होते. कारण इंग्रजी शिक्षण हे या नवीन वर्गाची मने जिंकण्यासाठी कुट हेतूने सुरू केले होते. इंग्रजी राजवटीने या वर्गाची प्रगती झाल्याने त्याला इंग्रजी राजवटी विषयी प्रेम, आपुलकी वाटू लागली. इंग्रज राजवट टिकण्यातच आपल्या देशाचे हित आहे अशी भावना त्याची बनली. समाजाचे नेतृत्व या वर्गाकडे आल्याने बंगाली जनतेने इंग्रज राजवटीविरूध्द चळवळ केली नाही.

इ.स. १८२० ते १८८४ या काळात राजा राममोहन रॉय, टागोर, केशवचंद्र सेन इत्यादी सुधारकांच्या प्रयत्नाने बंगाल प्रांतात सामाजिक, धार्मिक-शैक्षणिक क्षेत्रात मोठया प्रमाणात जागृती घडून आली. परंतु राजकीय क्षेत्रात जागृती झाली नाही. सुरेंद्रनाथांनी काही प्रमाणात राजकीय जागृतीचे कार्य केले. परंतु त्यांना ब्रिटिशनिष्ठ राजकीय जागृती अभिप्रेत होती. या काळातील बंगाली राजकारणाचे स्वरूप बंगाली नेत्यांच्या भाषेतच सावरकरांनी स्पष्ट केले आहे. या नेत्यांच्या मते इंग्रजी राज्य हे भारताला लाभलेले ईश्वरी वरदान आहे. स्वत:च्या रामराज्यापेक्षा किंवा चंद्रगुप्त, अशोक, विक्रमादित्य इत्यादी आमच्या सम्राटांच्या राजवटीपेक्षा ही परकीय इंग्रजी राजवट हितकारक आहे. या राजवटीतच भारताचा विकास होईल. म्हणून इंग्रज सत्तेशी राजनिष्ठ राहणे आणि ब्रिटिश सम्राटाचे कृपाछत्र भारतावर अभंग राखणे यातच या देशाचे कल्याण आहे. अशा प्रकारची ब्रिटिशनिष्ठता बंगाली जनतेत रूजली होती.[६] (स्वा.सावरकर आत्म-चरित्र - पूर्वपिठिका, स.सा.वा.खंड१, पृ.१६)

बंगाल प्रांताप्रमाणेच मद्रास, आंध्र, कर्नाटक आणि गुजरात प्रांतातही इंग्रजी शिक्षणाचा झपाट्याने प्रसार होऊ लागला. त्यामुळे या सर्व

प्रांतात सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक जागृती झाली. परंतु राजकीय जागृती झाली नाही. त्यामुळे या सर्व प्रंतात ब्रिटिशनिष्ठतेचे राजकारण सुरु झाले. सत्तावनच्या स्वातंत्र्य युध्दानंतर दिल्ली, बुंदेलखंड, बिहार, उत्तर प्रदेश इत्यादी प्रांतातातील जनता राजकीय दृष्टया दबलेली होती. कारण सत्तावनच्या क्रांती युध्दाचा हा प्रदेश रणक्षेत्र होता. आपल्या स्वदेश आणि स्वधर्म रक्षणासाठी येथील जनतेने आपले प्राण पणास लावले होते. त्यामुळे युध्दानंतर इंग्रजांनी त्यांचा अत्यंत निर्दयपणे छळ सुरु केला. या छळाने हा सर्व प्रदेश मुर्च्छित होऊन पडलेला होता. परंतु नंतरच्या काळात या प्रदेशातील मुले इंग्रजांच्या शाळांतून इंग्रजी शिक्षण घेऊ लागली. त्यांना सत्तेच्या सेवाविभागातून नोक-या मिळू लागल्या. त्यामुळे या प्रांतातील इंग्रजी शिक्षित वर्ग विचाराने आणि आचाराने ब्रिटिश बनत गेला. पंजाब प्रांतातही इतर प्रांताप्रमाणेच इंग्रजी शिक्षितांचा नवा वर्ग उदयास आला. त्यामुळे येथे गुरु रामसिंगाची क्रांतीकारक उठावणी वगळता राजकीय जागृती घडून आली नाही.

सत्तावनच्या क्रांतीयुध्दाचा प्रक्षोभ कमी करण्यासाठी इंग्रजांनी काही बाबतीत माघार घेतली. त्यामध्ये इंग्रज सरकार हस्ते वा परहस्ते भारतीयांच्या धार्मिक बाबतीत हस्तक्षेप करणार नाही. मिशनरी प्रचाराला इंग्रज अधिका-यांनी उघडपणे प्रोत्साहन व सवलती देण्याचे बंद केले. संस्थानिकांचा दत्तक वारसाचा अधिकार मान्य केला, तरी देखील येथील संस्थानिकांनी इंग्रजी सत्तेबाबत इतकी धास्ती घेतली की राजकीय जागृतीबाबत "ब्र" शब्दसुध्दा काढला नाही. एवढेच नव्हे तर आपल्या संस्थानातील जनतेत इंग्रज सत्तेविरुध्द राजकीय प्रवृत्ती वाढू नये याची अत्यंत दक्षता घेतली. उपट त्यांनी इंग्रज साम्राज्य गौरवाची आणि इंग्रजाशी असलेल्या राजनिष्ठेची निदर्शने करण्याची

कल्पकाची एकही संधी सोडली नाही. त्यामुळे भारतीय संस्थानिकांतही राजकीय जागृती घडून आली नाही. [७]

हिंदुस्थान जिंकून घेण्यासाठी इंग्रजांना मराठे आणि शीख या दोन सत्तांशी प्रदीर्घ संघर्ष करावा लागला. अर्थात या संघर्षात अखेर इंग्रजांचा विजय झाला. या दोन सत्तांपैकी शीखांना आपल्या स्वातंत्र्याचा विसर लवकरच पडला. त्यामुळे त्यांनी इंग्रज सेवेला मन:पूर्वक वाहून घेतले. मराठ्यांना मात्र आपल्या पराभवाचे शल्य सतत बोचत राहिले. सर्व सामान्य जनतेलाही इंग्रज या प्रबळ परकीय शत्रूची चिंता वाटू लागली. आपल्या हातात आलेल्या अखिल भारताचे प्रभुत्व पाहता पाहता इंग्रजांनी हिसकावून घेतले याची महाराष्ट्रीय जनतेला चीड येऊ लागली. आपल्या वैभवाची आणि पराभवाची आठवण काही केल्या त्यांच्या मनांतून गेली नाही. रामेश्वरपासून ते अटकेपर्यंत रणांगणे गाजविणारे शूर वीर त्यांना आपल्या स्वप्नात दिसत. सिंधु नदीचे पाणी पीत असलेल्या आपल्या हजारो विजयी घोड्यांच्या टापांचे आवाज त्यांच्या कानात अजून घुमत होते. त्यामुळे इंग्रजांशी आलेले वैर ते विसरले नव्हते. त्या वैराचा सूड घेण्यासाठीच सत्तावनच्या क्रांतीयुध्दात नानासाहेब, तात्या टोपे, राणी लक्ष्मीबाई इत्यादींनी आपले प्राण पणास लावले. त्यामुळे महाराष्ट्राला परराज्याची चिंता वाटू लागली. थोडक्यात इंग्रजांनी महाराष्ट्राचे राज्य पूर्णपणे जिंकले तरी महाराष्ट्राचे मन मात्र पूर्णपणे जिंकले नव्हते.

पराजितांची मने जिंकण्यासाठी इंग्रजांनी संपूर्ण भारतात इंग्रजी शिक्षणाची उपाययोजना केली. परंतु हा प्रयोग इतर प्रांताप्रमाणे महाराष्ट्रात यशस्वी झाला नाही. महाराष्ट्रात इंग्रजी शिक्षितांचे खालील तीन पक्ष उदयास आले.

१) ब्रिटिशनिष्ठ पक्ष, २) स्वदेशनिष्ठ पक्ष, ३) सशस्त्र क्रांतीनिष्ठ पक्ष

१) <u>ब्रिटिशनिष्ठ पक्ष :</u>

बंगाल, मद्रास इत्यादी प्रांताप्रमाणेच महाराष्ट्रातही इंग्रजी शिक्षितांचा एक ब्रिटिशनिष्ठ पक्ष उदयास आलेला होता. या पक्षाची ब्रिटिशनिष्ठता सावरकरांनी पुढीलप्रमाणे स्पष्ट केली आहे. आपले स्वराज्य गेले हे बरे झाले. इंग्रजांचे राज्य भारताच्या कल्याणासाठी परमेश्वराने दिलेले वरदान आहे. इंग्रज सत्ता आणि त्यांचे कृपाछत्र तीन-चारशे वर्षे राहण्यातच आपले कल्याण आहे. आमचे सर्व पूर्वज अडाणी, धर्मभोळे आणि मुर्ख होते. सत्तावनचे बंड हे आपल्या देशावर आलेले संकट होते. बंडवाल्यानी जो राष्ट्रद्रोह केला त्यामुळे आमच्या तोंडाला काळोखी फासली गेली. तरीही या महापापांना क्षमा करून भारताच्या कल्याणासाठी इंग्रजांनी राणीचे घोषणापत्र प्रसिध्द केले. ते घोषणापत्र आपल्या हक्कांची सनद आहे. इंग्रज लोक न्यायी आहेत. आपला उध्दार झाला की, स्वत: होऊन ते आपल्याला राज्य परत देतील. परंतु कृपा करून त्यांनी राज्य परत देण्याची घाई करू नये. "अशा प्रकारे इंग्रज राजवटीच सुराज्याची कल्पना अभिप्रेत असलेली विचारसरणी ब्रिटिशनिष्ठ पक्षाची होती."

त्यामुळे या पक्षातील अग्रणी असणारे नेते रावसाहेब मंडलीक क्रांतीयुध्दाबाबत म्हणतात की, "प्रगतीच्या नावाखाली हा जो स्फोट झाला आहे. त्यामुळे राष्ट्रावर एक प्रकारे संकटच आलेले आहे," इंग्रज सत्तेला या देशात सुधारणा करण्याची व पाहिजे त्याला न्याय देण्याची इच्छा आहे. परंतु या बंडामुळे आपले किती नुकसान होईल हे आता सांगता येणार नाही." "या पक्षातील दुसरे नेते विनायक कोंडदेव ओक यांनी बंडाविषयी लिहिताना, "बंडवाल्यानां भंड, गुंड, पुंड असे म्हणून खूपच शिव्या दिल्या." रावबहाद्दूर गोपाळ हरी देशमुख यांनी अगदी गणिती भाषेत लिहिले की, "इंग्रजांतील

अगदी सामान्य व्यक्ती ही हिंदी जनतेपेक्षा हजारपटीने श्रेष्ठ व शहाणी आहे. तेव्हा इंग्रजांप्रमाणे शहाणपण येण्यासाठी परमेश्वराने भारताला इंग्रजांच्या ताब्यात दिलेले आहे."

या पक्षात काही विद्वान आणि प्रामाणिक देशभक्त होते. परंतु अनेकजण पोटभरू, संधिसाधू होते. तसेच काहीजण सरकारी नोकरीसाठी इंग्रजांची हांजी हांजी करणारे होते. अर्थात ब्रिटिशनिष्ठ पक्षाची ताकद फार मोठी नव्हती, तरी देखील इंग्रज सरकार हेतुपूर्वक या पक्षाला सर्व जनतेचा पक्ष मान्यता देत असे. सार्वजनिक प्रश्नावर या पक्षाच्या शिष्ट-मंडळाचे म्हणणे ऐकून घेत. अर्थात देणे-घेणे शून्य तरीपण सरकारी दरबारी या पक्षाला मान दिला जाई.

ब्रिटिशनिष्ठ वा मवाळवादी पक्षाचे नेतृत्व न्या. रानडे यांच्याकडे होते. त्यांनी देशाच्या ऐतिहासिक, सामाजिक, धार्मिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रात नवजीवन आणण्यासाठी अनेक लहान मोठया संस्था स्थापन केल्या आणि या संस्थाद्वारे देशातील विस्कळीत समाजाला संघटित करण्याचे महान कार्य केले.[८] सावरकर ज्यांना ब्रिटिशनिष्ठ पक्ष म्हणून संबोधित होते ते नेमस्त राजकारण करणारे उदारमतवादी देशभक्त होते. असे आपण लक्षात घेतले पाहिजे.

२) <u>स्वदेशनिष्ठ पक्ष :</u>

महाराष्ट्रातील इंग्रजी शिक्षितांचा दुसरा पक्ष म्हणजे स्वदेशनिष्ठ पक्ष होय. या पक्षाला आपले स्वराज्य गेले याचे दु:ख वाटत होते. इंग्रजांचे

राज्य हे ईश्वरी वरदान नसून तो एक भीषण शाप आहे असेही या पक्षाला वाटे. या पक्षाची देशावर निष्ठा असल्याने इंग्रजी शिक्षणाने या निष्ठेत आणखी भर पडली. भारतीय लोकांची धर्मनिष्ठा कमी व्हावी यासाठी ख्रिस्ती मिशनरी मोफत पुस्तके वाटीत, तसेच शाळांतून बायबल सक्तीने शिकवीत. परंतु स्वदेशनिष्ठ पक्षातील लोक तीच पुस्तके त्यांच्या तोंडावर फेकून मारीत आणि त्यांना सळो की पळो करून सोडीत. कोणी मिशनरी पुराणांना भाकडकथा म्हणाला की, या पक्षातील लोक बायबलात असणाऱ्या कथा या भाकडकथाच नव्हेत काय ? असा प्रतिप्रश्न सवाल करून त्यांचे तोंड बंद करीत. स्वधर्म, स्वदेश, स्वभाषा, स्वसंस्कृती यांचा सार्थ अभिमान या पक्षाला वाटत असे. इंग्रजी शिक्षणाने तो अभिमान अधिक तेजस्वी झाला. बदलत्या काळानुसार त्याला सुधारणा पाहिजे होत्या, इंग्रजी शिक्षणाने झालेले लाभ तो नाकारीत नसे. परंतु कोणी आपल्या पूर्वजांची किंवा प्रचीन इतिहासाची निंदा केली तर ती खपवून घेत नव्हता. काही झाले तरी आम्ही इंग्रजांची राजकीय गुलामगिरी आनंदाने स्वीकारावी, त्यातच आमचे कल्याण आहे अशी निष्ठा बाळगून त्यांचे आभार मानावयाला इंग्रज हे कोणी देवदूत लागून गेले आहेत की काय ? अशी रोखठोक टीका हा पक्ष करीत असे. इंग्रज सत्तेने झालेल्या राष्ट्रीय दुर्दशेचे दारिद्र्याचे आणि दुष्काळाचे स्वरूप या पक्षाने उघडे करून दाखविले. जनतेत राजकीय जागृती करून इंग्रज सत्तेविरूद्द असंतोष पसरविला. आपला देश सर्व बाजूंनी असंघटीत, निशस्त्र असल्याने इंग्रज राजवट सशस्त्र क्रांतीने उलथून टाकण्याचा प्रयत्न करणे हे या पक्षाला आत्मघाताचे वाटे.

अशा परिस्थितीत इंग्रजी सत्तेविरूद्द जनतेत जास्तीत जास्त असंतोष निर्माण करावा. त्यासाठी कितीही संकटे आली तरी पाठीमागे सरू नये. सरकारला संघटीत विरोध करण्याचे धाडस आणि ताकद जनतेत निर्माण केली तर आज ना उद्या ब्रिटिश सरकार भारताच्या मागण्या मान्य करील. भारतीयांना समानतेने वागविले जाईल असे असले तरी हा पक्ष "स्वराज्य" हा शब्द

आपल्या जन आंदोलनात उच्चारीत नव्हता. [१] कारण तसे करणे हे इंग्रज कायद्याच्या विरोधी होते. अशा प्रकारे स्वदेशानिष्ठ विचारसरणी या पक्षाची होती.

३) सशस्त्र क्रांतिनिष्ठ पक्ष :

महाराष्ट्रात त्या काळात असणारा इंग्रजी शिक्षितांचा तिसरा पक्ष म्हणजे सशस्त्र क्रांतिनिष्ठ पक्ष हा होय. इंग्लंडचा राजा हा आपला राजा आहे असे ब्रिटिशानिष्ठ पक्षाने नाव काढताच, "नाही" इंग्रजांचा राजा तो आपला राजा नाही, घरात शिरला चोर आणि त्याला मानता आपला राजा ? असे खडसून सांगणारा हा सशस्त्र क्रांतिनिष्ठांचा पक्ष होता. या पक्षाचे उघड असे कोठेही ठिकाण नव्हते. तसेच त्याचे अस्तित्व नाही असे एकही ठिकाण नव्हते. क्रांतिकारक प्रवृतीनां नष्ट करण्यासाठी इंग्रजांनी सुरु केलेल्या शाळा, कॉलेज यांतून या पक्षाचे छुपेक्रांतिकारक असत. प्रत्यक्ष सरकारी नोकरी करणाऱ्यातही या पक्षाचे अनुयायी कार्यरत असत. कायद्याच्या बंधनात राहून आम्ही राजकीय चळवळी करु आणि इंग्रजांना नरम आणू अशी अपेक्षा करणे हे मुर्खपणाचे आहे असे या पक्षाला वाटत असते. इंग्रजांनी सुरु केलेल्या शिक्षणाचा परिणाम म्हणजे या पक्षात इंग्रज द्वेषाची भावना वाढीस लागली. भारताची दुर्दशा करणाऱ्या घटनांचे वर्णन त्यांना इंग्रजांच्या ग्रंथातूनच वाचावयास मिळाले. तसेच युरोप आणि अमेरिकेतील राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या युध्द कथा त्यांच्या वाचनात आल्या. त्यामुळे त्यांची दृष्टी विशाल, व्यापक ध्येय आणि अद्ययावत ज्ञान बनले.

श्रीकृष्ण, छ. शिवाजी महाराज ही क्रांतिनिष्ठ पक्षाची प्रेरणास्थाने होती. सत्तावनच्या क्रांतियुध्दातील नानासाहेब, तात्या टोपे, राणी लक्ष्मीबाई

इत्यादींच्या वीर कथा इंग्रजांची कडक बंधने असतानाही त्यांच्या काना-कानांतून आणि मनामनांतून कुजबुजल्या जात. त्यामुळे त्यांची अंत:करणे क्रांतीने पेटून जात. ते क्रांतीयुध्द महाराष्ट्रात करण्याची गुप्तसिध्दता अठराशे सत्तावनमध्येच सुरु झाली होती. तात्या टोपेचे संघटीत सैन्य महाराष्ट्रात येण्याचा अवकाश होता. तात्या टोपे महाराष्ट्रात आला तेव्हा इंग्रजांची एकदम तारांबळ उडाली. परंतु निजामाच्या देशद्रोही कृत्याने तात्या टोपेला पुढे येता आले नाही. तेथूनच परत फिरावे लागले. त्यामुळे महा-राष्ट्रातील त्याचे अनेक साथीदार उघडे पडले. त्यातील काहींना पकडून फाशी देण्यात आले, तर काहींना तुरुंगात ठेवण्यात आले. तरीपण जे काही उरले त्यांनी भूमिगत राहून क्रांतीचे कार्य पुढे चालू ठेवले. राष्ट्रभक्त तरुणांनो, मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी इंग्रजांशी लढण्याचे पुन्हा प्रयत्न करा असे ते सांगत होते. [१०]

सशस्त्र क्रांतीच्या मार्गानेच हाकलून दिल्याशिवाय इंग्रज लोक हा देश सोडून जाणार नाहीत. अशी विचारसरणी या पक्षाची होती. सशस्त्र क्रांती करणे हे शक्य नाही, हा तुमचा मूर्खपणा ठरेल. विना-कारण आपले मरण का ओढवून घेता ? असा उपदेश ब्रिटिशनिष्ठ पक्षाने केला तर त्यांचे आभार मानून ते म्हणत, "मरण" ? आमच्या मातृभूमीच्या सिंहासनावर शत्रूने चढून असावे आणि आम्ही ते जिवंत राहून पहावे, हेच आम्हास मरणाहून असह्य वाटत आहे. शक्य असो वा नसो, यश येवा वा अपयश, पण आम्ही आपल्या देशशत्रूचा सूड घेणार. यासाठी येणाऱ्या मरणाचे आम्हाला आकर्षण वाटत आहे. आम्ही आमचे कर्तव्य करणार, मग इतर कोणी आमच्या मागे येवा वा ना येवो" पुढे याच विचारसरणीचा प्रभाव सावरकरांच्यावर पडला.

१८५७ मध्ये महाराष्ट्रात फार मोठ्या प्रमाणात सशास्त्र उठाव झाले नसले तरी या प्रांतात इंग्रेज सत्तेविरूद्द लहान-मोठे संघर्ष होतच होते. उमाजी नाईक आणि खानदेशातील भिल्लांनी या काळात इंग्रजाविरूद्द उठाव केले. महाराष्ट्रातील पहिला सशास्त्र उठाव राष्ट्रभक्त वासुदेव बळवंताने केला. त्याने रामोशी लोकांच्या मदतीने काही भागात इंग्रजांचे राज्य नष्ट केले. परंतु त्याचा उठाव अयशास्वी ठरला. असे असले तरी त्याने पुढे येणाऱ्या अनेक क्रांतिकारकांना राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी सशास्त्र क्रांतीची आणि संघर्षाची प्रेरणा दिली.

## (४) स्वा. सावरकरांचे संक्षिप्त जीवन चरित्र

इंग्रजी राजवटीचे भारतीय जनजीवनावर मोठे प्रतिकूल परिणाम घडून आले. विसाव्या शतकाच्या सुरूवातीस इंग्रजी राजवटीच्या विरोधात देशातील लहान-मोठ्या शहरात लोकमत निर्माण होत होते. स्वा. सावरकर ज्या सार्वजनिक आणि राजकीय परिस्थितीत वाढले, त्या परिस्थितीत इंग्रज विरोधी आणि भारतीय देशभक्तीची भावना मोठ्या वाढीस लागली होती.

स्वा. बॅ. विनायक दामोदर सावरकर यांचा जन्म शालिवाहन शाके १८०५, वैशाख कृष्ण ६, सोमवार दिनांक २८ मे, १८८३ रोजी नाशिक जिल्ह्यातील भगूर या गावी झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण भगूर येथे झाले. बालवयातच त्यांच्यावर राष्ट्रवादी विचारांचे संस्कार झाले. माध्यमिक शिक्षण नाशिक येथे झाले. वासुदेव बळवंत फडके, वीर चापेकर बंधू आणि रानडे यांनी केलेल्या देशसेवेच्या कार्याची प्रेरणा त्यांनी वयाच्या सोळाव्या वर्षी

राष्ट्रीय स्वातंत्र्याची शपथ घेतली. स्वदेशीचा फटका, चाफेकर आणि रानडे यांजवरील फटका या राष्ट्रीय विचारांच्या कविता केल्या. त्यांनी १ जानेवारी, १९०० रोजी "मित्रमेळा" या गुप्त संघटनेची स्थापना केली. पुढे या गुप्त संघटनेला १९०४ मध्ये "अभिनव भारत" हे नाव दिले. १९०१ मध्ये सावरकर मॅट्रीक परीक्षा उत्तीर्ण झाले. राष्ट्रीय स्वातंत्र्याची भावना जनतेत वाढीस लागावी म्हणून १९०२ मध्ये "स्वतंत्रतेचे स्तोत्र" लिहिले. पुढे सावरकर महाविद्यालयीन शिक्षणासाठी पुणे येथे आले. पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयात शिक्षण घेत असतानाच त्यांनी सार्वजनिक कार्याला सुरुवात केली. १९०५ मध्ये इंग्रजांनी बंगालची फाळणी केली, त्या विरोधात वंगभंग विरोधी आंदोलन सुरू झाले. या आंदोलनाचा भाग म्हणून सावरकरांनी पुण्यात परदेशी कपडयांच्या होळीचा एक कार्यक्रम घडवून आणला. या काळातच तानाजी आणि बाजीप्रभू देशपांडे यांच्यावर राष्ट्रवादी विचाराचे पोवाडे लिहिले. तसेच शिवाजी आणि गणेशोत्सव असे राष्ट्रीय उत्सव या काळातच घडवून आणले. २१ डिसेंबर, १९०५ रोजी सावरकर बी.ए. परीक्षा उत्तीर्ण झाले. [११]

स्वा. सावरकर पुढे उच्च शिक्षणासाठी ९ जून १९०६ रोजी लंडनला गेले. तेथे विद्यार्थी दशेत असताना ऑगस्ट कॉम्त, चार्लस् डार्विन, जॉन स्टुअर्ट मिल्, हर्बर्ट स्पेन्सर इत्यादी विचारवंताच्या विचारांचा प्रभाव त्यांच्यावर पडला. "जीवन कलहात जो श्रेष्ठतम ठरतो तोच जगतो" या सिध्दांताचा प्रभाव त्यांच्यावर एवढा पडला की, त्यांनी हिंदु राष्ट्राच्या संघटनाच्या दृष्टीने या सिध्दांताचा पुढे वारंवार पुनरुच्चार केला.

इंग्रजांची राज्यपध्दती जवळून पहावी, बॅरिस्टरची पदवी मिळवावी,

क्रांतीची संघटना कशी बांधावी हे शिकावे, आणि मातृभूमीच्या स्वातंत्र्याचा लढा सुरु ठेवण्याची प्रेरणा तेथे येणाऱ्या निवडक भारतीय तरुणांना द्यावी. अशा विविध हेतूसाठी त्यांनी देशाटन केले. त्यासाठी त्यांनी तेथे "फ्री इंडिया सोसायटी" संस्थेची स्थापना केली. या संस्थेद्वारे भारतीय तरुणांना संघटीत त्यांच्यातून राष्ट्रभक्त व क्रांतीवीर तयार करण्याचा उपक्रम सुरु केला. यासाठी त्यांनी भाई परमानंद, वीरेंद्रनाथ चट्टोपाध्याय, सरदारसिंग, मॅडम कामा, सेनापती बापट, पी.टी. आचार्य, लाला हरदयाळ असे अनेक सहकारी मिळविले. त्यांनी आपल्या पहिल्या सहा महिन्याच्या वास्तव्यात जोसेफ मॅझिनीच्या आत्मचरित्राचे मराठीत भाषांतर केले. मॅझिनीच्या राष्ट्रवादी विचारांची प्रेरणा घेऊन सावरकरांनी इंग्लंडमधील भारतीय तरुणांत राष्ट्राभिमान आणि स्वातंत्र्यप्राप्तीची भावना वाढीस लावण्याच्या प्रयत्नांना सुरुवात केली. [१२] तसेच स्वातंत्र्याची भावना प्रबळ करण्यासाठी "लंडनची बातमी पत्रे" लिहिण्यास सुरुवात केली.

१९०७ मध्ये साम्राज्यकर्त्यांनी १८५७ चे बंड यशस्वीरित्या मोडून काढण्याची अर्धशताब्दी उत्सवपूर्वक साजरी केली. त्याला प्रत्युत्तर म्हणून सावरकरांनी १८५७ च्या स्वातंत्र्य समराचा वाढ दिवस साजरा केला. १० मे १९०७ रोजी इंग्लंडमधील भारतीयांनी सभा घेवून राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या शपथा घेतल्या. १८५७ च्या स्वातंत्र्य-समरामातील हुतात्म्यांना श्रध्दांजली अर्पण केली, त्या स्वातंत्र्य समराची स्मृतिचिन्हे गर्वाने त्यांनी छातीवर मिरविली. १८५७ चा लढा हा स्वातंत्र्य लढा होता. हे सिध्द करण्यासाठी सावरकरांनी "१८५७ चे स्वातंत्र्य समर" नावाचा ग्रंथ लिहिला. सावरकरांचा सशस्त्र क्रांतीच्या मार्गावर विश्वास होता. केवळ सशस्त्र क्रांतीच्या मार्गानेच भारताला स्वातंत्र्य मिळेल अशी त्यांची मनोभावना होती. म्हणून त्यांनी

अर्ज, विनंत्या, मागण्या, निवेदने इत्यादी नि:शस्त्रवादी मार्गांना विरोध केला.

सावरकरांनी इंग्लंडमध्ये "अभिनव भारत" या संघटनेद्वारे अनेक चळवळी, समारंभ, उत्सव इत्यादी कार्यक्रम घडवून आणले. या चळवळींचा परिणाम घेऊन १३ मार्च १९१० मध्ये त्यांना अटक करण्यात आले. बॉम्ब व पिस्तुले पुरविणे, राष्ट्रद्रोही कारवाया करणे असे आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आले. तसेच कर्झन वायली व जॅक्सन यांच्या हत्त्येमुळे इंग्रज सरकारचा सावरकरांवरील संशय जास्तच बळावला. ६ जुलै, १९१० रोजी सावरकरांना लंडनहून मुंबईला आणण्यात आले. सप्टेंबर १९१० पासून त्यांच्यावरील खटल्याच्या कामकाजाला सुरुवात झाली. २४ डिसेंबर, १९१० रोजी पहिल्या खटल्यात सावरकरांना जन्मठेपेची शिक्षणा सुनावण्यात आली. तर ३० जानेवारी, १९१० रोजी दुसरी जन्मठेपेची शिक्षणा देण्यात आली. ३० ऑगष्ट रोजी त्यांना बंदी म्हणून अंदमानात पाठविण्यात आले. [१३]

इ.स. १९११ ते १९२१ या अंदमान काळात सावरकरांनी बरेच कार्य केले. त्यांनी बंदीवानात साक्षरतेचा प्रसार केला. "चांदोबा चांदोबा भागलास का ?" सायंघंटा, बंदा वीर, बेडी, कोठडी, रविंद्रनाथांचे अभिनंदन, आकांक्षा, जगन्नाथाचा रथोत्सव, कमला, गोमंतक, रानफुले अशी काव्य संपदा निर्माण केली. हिंदूचे धर्म शुध्दीकरण, हिंदुत्वाचा प्रचार केला.

सावरकरांना मे, १९२१ मध्ये अंदामानातून रत्नागिरीच्या तुरुंगात आणण्यात आले. रत्नागिरीच्या तुरुंगातही त्यांनी शिक्षण प्रसार, धर्मशुध्दी चळवळ इत्यादी कार्यास सुरुवात केली. पुढे त्यांना पुण्याच्या कारागृहात

ठेवण्यात आले. ६ जानेवारी १९२४ रोजी त्यांची सशर्त मुक्तता करण्यात आली. त्यानंतर १९२८ ते १९३६ हा काळ त्यांना रत्नागिरीत स्थान-बध्दतेत काढावा लागला. या काळात राजकारणात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष-पणे भाग घेण्याविषयी त्यांच्यावर निर्बंध घालण्यात आले. त्यामुळे सावर-करांनी या काळात सामाजिक सुधारणांचे कार्यक्षेत्र निवडले. सामाजिक सुधारणांसाठी त्यांनी अस्पृश्यता निवारण, जातीभेद उच्चाटन, शुध्दी चळवळ, भाषा शुध्दी असे विविध उपक्रम हाती घेतले. १० मे १९३७ रोजी रत्नागिरीच्या स्थानबध्दतेतून विनाअट संपूर्ण मुक्तता करण्यात आली. [१४]

सावरकरांनी स्थानबध्दतेतून मुक्तता झाल्यानंतर राजकारणात सक्रीय भाग घेतला. १ ऑगस्ट, १९३७ रोजी लोकशाही स्वराज्य पक्षात प्रवेश केला. हिंदु महासभेत राहून हिंदुत्व, हिंदु राष्ट्र यांचा पुरस्कार केला. १९३७ ते १९४३ असे सात वर्ष ते हिंदु महासभेचे अध्यक्ष होते. ३० जानेवारी, १९४८ रोजी गांधी हत्येच्या आरोपाखालील त्यांना एक वर्ष कारागृहात ठेवण्यात आले. अर्थात या आरोपातून निर्दोष मुक्तता झाली. १९५० मध्ये राजकारणातून निवृत्त होण्याचा निर्णय घेतला. १० मे, १९५२ रोजी "अभिनव भारत" या संस्थेचे विसर्जन केले. राजकारणातून निवृत झाल्यानंतरही त्यांनी देशांतर्गत व बाह्य राजकीय घडामोडीकडे विशेष लक्ष दिले. १९६२ चीन-भारत व १९६५ च्या भारत - पाकिस्तान युध्दाविषयी आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या. १९६३ मध्ये वृध्दापकाळ व प्रकृती अस्वास्थ यामुळे त्यांना काही काळ रुग्णालयात राहावे लागले. अखेर शनिवार दिनांक २६ फेब्रुवारी, १९६६ रोजी सावरकरांचे मुंबई येथे निधन झाले. [१५]

## (५) स्वा. सावरकरांच्या वरील वैचारिक प्रभाव

प्राचीन भारतातील पौराणिक पुरूष, भगवान, श्रीकृष्ण, श्रीराम, मधल्या काळातील छ. शिवाजी महाराज, गुरु गोविंदसिंह यासारखे ऐतिहासिक पुरूष, पाश्चमात्य विचारवंत तसेच भारतीय क्रांतिकारकांच्या विचारांचा वैचारिक प्रभाव स्वा. सावरकरांच्यावर पडला.

सावरकरांच्या मनावर बालपणापासून श्रीराम, आणि भगवान श्रीकृष्ण या पौरागिण पुरूषांच्या चरित्राचा वैचारिक प्रभाव पडला होता. त्यांचे आई-वडील व वडीलबंधू बाबाराव यांच्याकडून रामायण, महाभारत, रामविजय, हरिविजय, पांडवप्रताप, शिवलीलामृत इत्यादी ग्रंथांचे ओविबध्द वाचून घेत. आणि त्यावर चर्चा करीत. त्यामुळे सावरकरांच्या मते, श्रीराम हा अवतारी पुरूष होय. राष्ट्रहितासाठी त्याने स्वत:च्या राज्याचा त्याग केला. केवळ लोकांच्या आक्षेपामुळे सीतेला वनवासात पाठविले. राज्याच्या कर्तव्यासाठी स्वत:च्या वैयक्तिक सुखाचे बलीदान केले, रावणाचा नाश करून अनेक राष्ट्रे स्वतंत्र केली. त्यामुळे आपणांस कर्तव्य दक्षतेची शिकवण श्रीरामापासूनच मिळाली आहे, असे सावरकरांचे मत बनले. श्रीरामाप्रमाणेच त्यांच्यावर भगवान श्रीकृष्णाच्या कर्तव्य कर्माचाही वैचारिक प्रभाव पडला. कोणत्याही फळाची अपेक्षा न करता प्रत्येकाने आपले कर्तव्य कर्म करावे. न्यायासाठी दुष्टांचा वध करावा. आणि कोणत्याही प्रकारचा स्वार्थ मनात न ठेवता सत्याचा पक्ष घेऊन शत्रूच्या नाश करावा. अशी श्रीकृष्णाची शिकवण आहे. श्रीकृष्णाचे नीतिशास्त्र हे क्रांतीकारक शास्त्र आहे. हीच क्रांतीची मनुस्मृती आहे असे सावरकर मानीत आणि महाभारतातील कृष्णाच्या अनेक प्रसंगाच्या भाषणावरून, उपदेशावरून व व्यवहारावरून सिध्द करीत की, "उपयुक्तवादाचा पहिला प्रणेता श्रीकृष्णाच आहे. [१६]

छ. शिवाजी महाराजांनी स्वदेश व स्वधर्मासाठी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्याचा वैचारिक प्रभाव सावरकरांच्यावर पडला. छ. शिवाजी महाराज हे त्यांचे राष्ट्रीय स्वातंत्र्याचे स्फूर्तिस्थान होते. म्हणून शिव-जन्मोत्सावाबाबत सावरकर म्हणातात, "आजपर्यंत महाराष्ट्रीयन लोक सांगत की, हा उत्सव ऐतिहासिक असून त्यात राजकीय हेतू नाही. परंतु माझ्या मते शिवजन्मोत्सव हा राजकीयच आहे. म्हणूनच हा उत्सव साजरा करण्याचा अधिकार केवळ आपल्या या परतंत्र मातृभूमीला स्वतंत्र करणाऱ्या लोकांनाच आहे. या उत्सवाचा मुख्य उद्देश म्हणजे इंग्रजांच्या गुलामगिरीच्या बेडया तोडून स्वदेशाला स्वतंत्र करण्याची प्रेरणा व शक्ती आम्हांला मिळावी हा आहे. शिवाजी महाराज ही स्वातंत्र्याची देवता आहे. म्हणून मी तिच्यापुढे प्रार्थना करतो की, "आम्हाला स्वदेश स्वातंत्र्याच्या कार्यात लढ-ण्याची आणि जिंकण्याची शक्ती मिळावी." [१७]

संत रामदासाच्या "स्वधर्म संरक्षण" संदेशाचाही वैचारिक प्रभाव सावरकरांवर पडला. सावरकरांच्या मते, रामदासांनी आपल्या स्वधर्म संरक्षणाच्या संदेशात सांगितले आहे की, परमेश्वराची आज्ञा तुम्हाला आहे की, स्वराज्य संपादन करा, कारण स्वराज्यामुळे स्वधर्माचे संरक्षण होते. जो स्वराज्य संपादन करीत नाही, तो गुलामगिरीत तटस्थ असतो. तो अधर्मी आणि धर्मद्रोही असतो म्हणून स्वधर्मासाठी स्वराज्य संपादन करा. राम-दासांच्या या दिव्य संदेशापासून प्रेरणा घेऊन सावरकरांनी स्वधर्म आणि स्वराज्यासाठी सुरु असलेल्या स्वातंत्र्य युध्दात सक्रीय भाग घेतला. [१८]

शिखांचे दहावे गुरु गोविंदसिंग यांच्या वृध्दिंगत देशभक्तीचाही प्रभाव सावरकरांवर पडला होता. गुरु गोविंदसिंहाबाबत सावरकर म्हणातात,

"शीख धर्माची देग, तेग आणि फत्ते ही तीन तत्वे आहेत. देग म्हणजे ध्येय. तेग म्हणजे तलवार आणि फत्ते म्हणजे विजय होय. तलवारीशिवाय स्वातंत्र्याचे ध्येय साध्य होत नाही असे लक्षात येताच गुरु गोविंदसिंहानी तलवार उपसली आणि युध्द केले. आणि युध्दात स्वातंत्र्याचा हिंदी पक्ष विजयी झाला. तेव्हा आपणाही त्यांच्या जन्मोत्सवी शस्त्र हाती घेऊन स्वातंत्र्य आंदोलन करुया. यात आपला विजय निश्चित आहे. [१९]

लो. टिळकांच्या राजकीय स्वराज्य आंदोलनाचाही प्रभाव सावरकरांवर पडला होता. भारताच्या राजकीय स्वातंत्र्यासाठी लो. टिळकांनी गणेशोत्सव, शिवोत्सव, राष्ट्रीय शिक्षण, बहिष्कार, सभा, संमेलने इत्यादी राष्ट्रीय कार्यक्रम सुरु केले. या कार्यक्रमामुळे सावरकर राष्ट्रवादाने प्रभावीत झाले. म्हणून लो. टिळकांबाबत ते म्हणतात, "लो. टिळकांच्या दिखावू ध्येयाच्या सुराज्य-होमरुल-स्वराज्य या पायऱ्या चढत. आम्ही त्यांच्या खऱ्या स्वातंत्र्य ध्येयाची पायरी चढलो. ते जे मनात बोलत ते आम्ही गर्जत, ते जेथे थांबत तेथून आम्ही पुढे सरत. ते नेले राष्ट्राच्या एक पाऊल पुढे असत, पण आम्ही त्यांच्यापुढे शंभर पावले जाऊन मार्ग सोपा करण्याचे काम करीत, त्यांची जी साधने बोथट होती, त्यांस आम्ही धार आणली. म्हणून आम्ही त्यांचे निष्ठावंत अनुयायी आहोत. कारण त्यांच्यापुढे धावून त्यांचे स्वातंत्र्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी झटलो. ते खड्गाची मूठ होते. आम्ही क्रांतीकारक त्यांचे पाते होतो. पाते मुठीच्याच जोरावर रणाकंदनी लढते. [२०]

<u>पाश्चिमात्य तत्वज्ञांचा वैचारिक प्रभाव :</u>

स्वा. सावरकरांच्या राष्ट्रवादी विचारांवर हर्बर्ट स्पेन्सर, ग्यारिबाल्डी, जोसेफ मॅझिनी, काऊंट काव्हूर इत्यादी पाश्चिमात्य तत्वज्ञानांच्या

विचारांचा प्रभाव पडला होता. याबाबत स्वत: सावरकर म्हणतात की, हर्बर्ट स्पेन्सर हिंदी राष्ट्राबाबत म्हणतो की, इंग्रजांनी हिंदुस्थानात जे प्रदेश जिंकले किंवा हिसकावून घेतले ते सर्व दुष्ट प्रवृतीने घेतले आहेत. तेव्हा इंग्रजांची ही प्रवृत्ती समाजभक्षक राक्षसाप्रमाणे आहे . अशा परिस्थितीत हिंदुस्थानने इंग्रजांचे परदास्याचे जोखड फेकून देण्याचा प्रयत्न केला तर तो गुन्हा ठरणार नाही. त्यामुळे मला हर्बर्ट स्पेन्सरच्या या स्वातंत्र्यवादी विचारांतून राष्ट्रीय स्वातंत्र्याची प्रेरणा मिळाली. [२१]

इटालियन क्रांतीकारक ग्यारिबाल्डी, जोसेफ मॅझिनी, काव्हूर या स्वातंत्र्यवाद्यांनी सन १८४८-४९ मध्ये इटलीच्या स्वातंत्र्यासाठी क्रांतीयुध्द केले. परंतु त्यात त्यांना अपयश आले, तरीही त्यांनी राष्ट्रीय त्यांनी राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी प्रयत्न सुरू ठेवले. त्यांच्या मते, "आपल्या इटलीप्रमाणे जे देश पारतंत्र्यात आहेत त्या देशांना स्वतंत्र होण्याचा अधिकार आहे. अशा देशांना आपण स्वातंत्र्यासाठी सक्रीय मदत केली पाहिजे." त्यामुळे हिंदुस्थानात जेव्हा १८५७ चे स्वातंत्र्य युध्द सुरू झाले तेव्हा त्याची बातमी ऐकून त्यांना हिंदी क्रांतीकारकांविषयी सहानुभूती वाटू लागली. त्यावेळी ग्यारिबाल्डीनीने तर शूर क्रांतिकारक सेनापती तात्या टोपेच्या खांद्याशी खांदा लावून इंग्रजांविरूध्द हिंदी स्वातंत्र्य युध्दात लढण्याची तीव्र इच्छा व्यक्त केली. परंतु इटलीत पुन्हा स्वातंत्र्यासाठी क्रांती युध्द सुरु झाल्याने त्याला तेथेच थांबावे लागले. त्यामुळे ग्यारिबाल्डीच्या स्वातंत्र्यवादी विचारांचा वैचारिक प्रभाव सावरकरांवर पडला.

जोसेफ मॅझिनीच्या विचारांचा वैचारिक प्रभाव सावरकरांच्यावर पडला. त्यांच्या मते मॅझिनी हा इटालियन स्वातंत्र्याचा प्रणेता होय. त्याने राष्ट्रीय

स्वातंत्र्य नि:शस्त्र किंवा भिक्षां देहीने मिळणार नाही म्हणून सशस्त्र क्रांतीच्या मार्गाचा स्वीकार केला. त्यासाठी त्याने राष्ट्रीय स्वतंत्रतेचे पुढील विचार मांडले. राजकारण हे नीतीला धरून असावे. राजकारणातील प्रथम कर्तव्य म्हणजे स्वातंत्र्य संपादन होय. ज्या राष्ट्रात हे सत्य प्रति-पादन करण्यास बंदी असते त्या राष्ट्राने गुप्तमंडळे स्थापन करावीत. या गुप्त मंडळाचे दुहेरी कर्तव्य असावे. पहिले कर्तव्य म्हणजे मानसिक शिक्षण होय. या मानसिक शिक्षणाने गुप्त व उघड रीतीने लोकांना स्वातंत्र्य, समता, राष्ट्रैक्य व लोकशाही या चार तत्वांचे शिक्षण द्यावे. दुसरे कर्तव्य असे की, या चार तत्वांच्या प्राप्तीसाठी गनिमीकाव्याने युध्द करावे. अशा रीतीने स्वदेश स्वतंत्र होताच त्याचे वर्तन असे ठेवावे की, त्याच्या योगाने मानवी प्रगतीला व विकासाला मदत व्हावी आणि नंतर आपणांस सामर्थ्य येताच इतर गांजलेल्या देशांना मुक्त करावे. मॅझिनीच्या या विचारांतून प्रेरणा घेऊन तरुण इटलीने ऑस्ट्रिया विरूध्द सशस्त्र क्रांती केली आणि इटलीचे स्वातंत्र्य मिळविले. त्यामुळे मॅझिनीच्या या विचारांतून स्फुर्ती घेऊन सावरकरांनी हिंदी स्वातंत्र्याचा लढा सुरु केला. [२२]

मॅझिनीप्रमाणेच काऊंट काव्हूरच्या स्वदेश मुक्ती लढयाचा वैचारिक प्रभाव सावरकरांच्यावर पडला. त्याच्या इटलीच्या अखंड स्वातंत्र्य लढयातून सावरकरांना हिंदी राष्ट्रवादाची प्रेरणा मिळाली. सावरकर त्याच्या विषयी म्हणतात, की इटलीच्या राष्ट्रीय स्वातंत्र्याचा लढा यशस्वी करण्यात राष्ट्रभक्त, कारस्थानी आणि निर्धारी प्रधान काव्हूरचा सिंहाचा वाटा होता. त्याने इटलीच्या स्वातंत्र्यासाठी एका बाजूने इंग्लंडची सहानुभूती आणि गुप्त सहकार्य मिळविले, आणि ऑस्ट्रिया व फ्रान्स यांना एकाएकी पाडून परस्परांना युध्दात गुंतविण्याचे कार्य केले. त्यामुळेच इटली स्वतंत्र झाली. [२३]

भारतीय क्रांतीकारकांचा वैचारिक प्रभाव :

स्वा. सावरकर यांच्यावर गुरु रामसिंग, क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके, वीर चापेकर बंधु, पं. शामजी कृष्णावर्मा इत्यादी भारतीय क्रांतीकारकांच्या विचारांचा वैचारिक प्रभाव पडला. त्यांच्या क्रांतीकारी विचारांतूनच सावरकरांना हिंदी राष्ट्रवादाची प्रेरणा मिळाली. सावरकरांच्या मते, इंग्राज सत्तेविरुध्द १८५७ नंतर पहिला सशस्त्र उठाव गुरु रामसिंगाच्या कुका चळवळीने केला. स्वधर्म कार्य स्वराज्य स्थापन केल्याशिवाय शक्य होणार नाही. म्हणून गुरु रामसिंगानी आपल्या धार्मिक पंथाला राजकीय स्वरुप देण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी त्यांनी प्रथम इंग्राजी न्यायालये, आगगाडया इंग्राजी शिक्षण संस्था यांवर बहिष्कार घालून इंग्राज सत्तेशी नि:शस्त्र असहकाराचा लढा पुरकारला आणि कुका पंथीयांचा एक स्वतंत्र टपाल विभाग सुरु केला. या कृतीमुळे इंग्राजांनी त्यांच्यावर कडक बंधने घातली. त्यामुळे या चळवळीचे गुप्त चळवळीत रुपांतर झाले. गुरु रामसिंगानी पंजाब प्रांताची बारा मंडळे करुन त्यावर एक एक गुप्त अधिकारी नेमला, आणि स्वतंत्र कारभार यंत्रणा निर्माण केली. इंग्राज सत्तेविरुध्द द्वेष पसरविणे, गोवधास विरोध करणे, राजकीय स्वातंत्र्य मिळविणे हे कुका चळवळीचे ध्येय रामसिंगानी मानले. त्यामुळे गुरु रामसिंगांच्या या राष्ट्रवादी विचारांचा वैचारिक प्रभाव सावरकरांवर पडला. [२४]

क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके यांचा जन्म १८४५ मध्ये झाला. १८५७ च्या स्वातंत्र्य युध्दातील नानासाहेब, तात्या टोपे, राणी लक्ष्मीबाई यांनी केलेल्या पराक्रमाच्या वीर कथा ऐकून वासुदेव फडके देशभक्तीने प्रेरीत झाले. सरकारी नोकरीत असताना इंग्राज अधिकाऱ्यांनी अन्याय केल्याने त्यांनी स्वत:स स्वदेश सेवेस वाहून घेतले आणि देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राण

पणास लावले. शस्त्र हाती घेतल्याशिवाय स्वराज्य मिळणार नाही हे त्यांचे ध्येय होते. आम्हाला इंग्रजांची सत्ता नष्ट करून हिंदुस्थानात स्वतंत्र लोकशाही स्वराज्य स्थापन करावयाचे आहे अशी घोषणा करून त्यांनी १८७९ मध्ये क्रांतीचे रणसिंग फुंकले. परंतु मेजर डॅनियलने वासुदेवाला पकडून त्यांच्यावर व त्यांच्या साथीदारांवर राणी सरकारविरुध्द सशस्त्र युध्द पुकारणे, दरोडे घालणे या आरोपाखाली खटला भरला. त्यावेळी त्यांनी स्वत: लिहिलेले आत्मवृत्त सरकारच्या वतीने पुरावा म्हणून सादर करण्यात आले. त्यात वासुदेव फडके म्हणतात, "अहो माझ्या हिंदुस्थानातील बांधवानो, मी तुमच्या कल्याणासाठी माझे प्राण पणास लावीत आहे. यात मी काही विशेष करतोय असे नाही. कारण दधिची ऋषिंनी देवांच्या कल्याणासाठी आपल्या अस्थी काढून दिल्या, त्याप्रमाणेच माझे प्राण घेऊन तरी परमेश्वराने तुमचे कल्याण करावे हीच माझी प्रार्थना आहे." माझे ध्येय हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळवून लोकशाही राज्याची स्थापना करण्याचे होते. परंतु ते साध्य झाले नाही, मला त्यात यश आले नाही. तरी-पण परमेश्वराला माहीत आहे की, मी हे सर्व देशासाठी केले आहे. या त्यांच्या राष्ट्रवादी विचारांचा प्रभाव सावरकरांच्यावर पडला. [२५]

सन १८९७ साली इंग्लंडची राणी आणि हिंदुस्थानची सम्राज्ञी व्हिक्टो-रिया हिच्या राज्यारोहणाचा हीरक महोत्सव देशभर सुरु झाला. दुष्का-ळाने आणि प्लेगाने पिडीत झालेल्या येथील जनतेला हा उत्सव वास्तविक नको होता. पुण्यात तर प्लेग निवारणाच्या नावाखाली गोऱ्या सोजीरांनी लोकांना हैराण करून, "दे माय धरणी ठाव" करून सोडले होते. प्लेग परवडला पण धुमाकूळ नको, असे पुणेकरांना वाटू लागले. लोकांच्या ह्या दु:खानां, काळ केसरीतून टिळक-परांजपे वाचा फोडीत होते. परंतु त्याचा

राजसत्तेवर काहीही परिणाम झाला नाही. शेवटी सरकारच्या प्लेग-निवारक अधिका-यांच्या जीवांचा सूड म्हणून चापेकर बंधूनी जिल्हाधिकारी रॅन्ड साहेब आणि पोलीस अधिकारी आयर्स्ट साहेब यांना २२ जून १८९७ रोजी राज्यपाल भवनातून राज्यारोहण समारंभ साजरा करून परत जात असताना, रात्रीच्या वेळी गणेशखींड मार्गावर गाठून त्यांच्यावर गोळया झाडून त्यांना यमसदनास धाडले. त्यामुळे इंग्रज साम्राज्यसत्ता हादरून गेली. तिची शोध चूके फिरू लागली. टिळक अटकेत पडले. चापेकर बंधूना आणि रानडे यांना पकडून त्यांना फाशीची शिक्षा झाली. तेव्हा येरवडा कारागृहात टिळकांना वंदन करून, भगवत गीता हाती घेऊन "भारत माता की जय","वंदे मातरम्" अशी घोषणा करीत चापेकर बंधू व रानडे हसत मुखाने फाशीच्या वधस्तंभावर चढले. भारतमातेच्या सेवेसाठी तिच्या कुशीत पुन्हा जन्म घेऊन परत येण्यासाठी ते स्वर्ग-लोकी गेले. किर्तीरूपे अमर झाले. त्यामुळे त्यांनी राष्ट्रसेवेसाठी केलेल्या प्राण बलीदानाने देशातील सर्व सामान्य जनतेत राष्ट्रसेवेची प्रेरणा निर्माण झाली. सारा देश त्या नशेने धुंद झाला. मग माझ्यासारख्या स्वदेशास स्वतंत्र करण्यास आधीच तळमळू लागलेल्या युवकाची गोष्ट काय सांगावी असे सावरकर आपल्या आत्म-चरित्रात लिहितात, त्यामुळे चापेकर बंधू आणि रानडे यांनी राष्ट्रसेवेसाठी केलेल्या प्राण बलीदानाचा वैचारिक प्रभाव सावरकरांवर पडलेला दिसतो. यातूनच "रणाविन स्वातंत्र्य कोणा मिळाले" अशी वैचारिक भावना बनली. भारतीय जनतेला दुःख आणि दारिद्र्य यांतून मुक्त करावयाचे असेल तर भारत-भूमीला स्वतंत्र केले पाहिजे. अशी राष्ट्रवादी भूमिका त्यांनी सातत्याने मांडली.

सावरकर जुले, १९०६ मध्ये उच्च शिक्षणासाठी लंडनला गेले. तेव्हा

ते पं. शामजी कृष्णवर्मा यांनी स्थापन केलेल्या "इंडिया हाऊस" मध्ये उतरले. तेथे पं. शामजी कृष्णवर्मा, बॅ. सरदारसिंगजी राणा, हेन्री मायर्स हिंडमन, मादाम कामा, लाला हरदयाल, यांच्या कार्याचा आणि विचारांचा प्रभाव सावरकरांवर पडला. त्यांच्या कार्याने आणि विचारांने सावरकर आपल्या मातृभूमीच्या दास्यविमोचनासाठी अधिक प्रभावित झाले.

पं. शामजी कृष्णवर्मा हे नि:सीम देशभक्त आणि नाणावलेले समाजसुधारक होते. त्यांचा जन्म भन्साली नावाच्या गावात एक गरीब कुटुंबात ४ ऑक्टोबर, १८५७ रोजी झाला. मुंबईच्या "एलिफन्स्टन" या माध्यमिक शाळेत त्यांनी मॅट्रिकपर्यंत शिक्षण घेतले. १८७५ मध्ये त्यांचा शेठ छबिदास लल्लूभाई यांच्या भानूमती या कन्येबरोबर विवाह झाला. पुढे प्रा. मोनियर विल्यम्स् यांच्या मदतीने १८७९ मध्ये जे उच्च शिक्षणासाठी लंडनला गेले. तेथे कॅंब्रिज विद्यापीठाची बी.ए. पदवी संपादन करून बॅरिस्टरीचा अभ्यास सुरु केला.

भारतात परत आल्यानंतर पं. शामजींनी रतलाम, उदेपूर आणि जुनागड या संस्थानामध्ये दिवाण म्हणून नोकरी केली. जुनागडच्या नोकरीत असताना त्यांना व्यक्तिगत शत्रूच्या कारस्थानामुळे दिवाण पद सोडावे लागले. एवढेच नव्हे तर त्यांना तेथून सीमापार करण्यात आले. तसेच त्यांच्या उदेपूरच्या दिवाणपदालाही पुन्हा मान्यता देण्यास आंग्ल राज्यप्रतिनिधीने नकार दिला. आपल्यावर झालेल्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी त्यांनी लो. टिळकांशी पत्रव्यवहार केला. हेतू हा की टिळकांनी

केसरीतून यासंबंधी वाचा फोडावी. परंतु चापेकर - रानड्यांच्या प्रकरणात टिळकांना पकडले जाताच आपले हितशत्रू आपल्यालाही या प्रकरणात धरतील म्हणून ते इंग्लंडला गेले. तोपर्यंत त्यांनी कोणतेही राजकीय कृत्य केले नाही.[२७]

भारतामधून इंग्लंडला आल्यानंतर पं. शामजी कृष्णावर्मा यांनी भारतीय स्वातंत्र्यासाठी काम केले. भारताला होमरूल मिळवून देण्यासाठी आयर्लंड व इंग्लंडमध्ये प्रचार केला. त्यासाठी त्यांनी "इंडियन होमरूल सोसायटी"ची स्थापना केली.

## "इंडिया हाऊस"ची स्थापना :

आपल्या या नवीन पक्षाची संघटना बळकट करण्यासाठी तसेच भारतीयांना स्वतंत्र आणि स्वदेशाभिमानी वातावरणात एकत्र राहता यावे म्हणून पं. शामजींनी १ जुलै, १९०५ रोजी लंडनमध्ये "इंडिया हाऊस" ची (भारत भवन) स्थापना केली. पं. शामजींच्या होमरूल वा स्वायत्ततेच्या इंग्लंडमधील चळवळीने भारतातील राजकीय क्षेत्रात चांगलीच खळबळ उडवून दिली. परंतु होमरूल वा स्वायत्तता म्हटली तरी ती मिळवायची कोणत्या साधनांनी ? त्याचा स्वदेशीयांना झेपेल असा नवा कार्यक्रम कोणता ? असा प्रश्न स्वपक्षीयांना वाटत होता. तेव्हा या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी पं. शामजींनी एक नवा कार्यक्रम आखला. त्या कार्यक्रमाविषयी पं. शामजी लिहितात की, "भारताला इंग्रजांच्या राजकीय दास्यातून मुक्त करण्याचे पुढील तीन मार्ग आहेत.

१. इंग्रजांनी आपण होऊन भारत सोडावा.
२. इंग्रजांचे हे परकीय सत्तेचे जू भारताने स्वत:च्या यशस्वी प्रयत्नाने फेकून द्यावे.

३. कोणत्यातरी इतर राष्ट्राने इंग्रजांच्या हातून भारताची मुक्तता करण्यासाठी निःस्वार्थ बुध्दीने मदतीस धावून यावे.

या तीन मार्गापैकी भारताच्या मुक्ततेसाठी दुसरा मार्गच श्रेयस्कर आहे असे पं. शामजींचे मत होते. म्हणून त्यांनी दुसरा मार्गच स्वीकारला.[२८]

स्वा. सावरकर भारताच्या स्वातंत्र्यासाठी प्रयत्न करणारे क्रांतीकारक आणि विचारवंत होते. त्यांनी आपल्या आयुष्याच्या पहिल्या टप्प्यामध्ये मोठया प्रमाणात क्रांती कार्य केले. भारतामध्ये आणि इंग्लंडमध्ये सशस्त्र क्रांतीच्या विचारांचा प्रचार आणि प्रसार केला. या काळातच त्यांचे राष्ट्रवादी विचार विकसित होत गेले. इंग्रजांचे राज्य भारताला वरदान नसून तो एक शाप आहे. कारण इंग्रजांनी सर्वच दृष्टया आपला देश नागवला आहे. म्हणून स्वातंत्र्याशिवाय आपल्या देशाचा सर्वांगिण विकास होणार नाही. स्वातंत्र्यासाठी सशस्त्र संघर्ष गरजेचा आहे. असे त्यांचे राष्ट्रवादी विचार बनले. या त्यांच्या विचारांवर श्रीकृष्ण, शिवाजी, रामदास, मॅझिनी, चापेकर बंधू आणि पं. शामजी कृष्णावर्मा वगैरे वेगवेगळया लोकांच्या विचारांचा प्रभाव पडला होता. या काळातील त्यांचा राष्ट्रवाद हा "भारतीय राष्ट्रवाद" होता. १९२३ ते १९२४ नंतर ते ज्या प्रकारच्या हिंदु राष्ट्रवादाची मांडणी करीत होते त्याच्यापासून तो वेगळा होता. पुढील तीन प्रकरणातून सावरकरांच्या "हिंदी राष्ट्रवादाचा" विकास कसा झाला याची चर्चा करण्यात येईल.

.......

## प्रकरण पहिले

## संदर्भ ग्रंथ


१. प्रधान, ग.प्र. - स्वातंत्र्य संग्रामाचे महाभारत,
साधना प्रकाशन, पुणे, १९८७, पृ.क्र. २.

२. नगरकर, वसंत - भारतीय स्वातंत्र्यसंग्राम,
प्रेस्टिज प्रकाशन, पुणे १९८१, पृ.क्र. १६.

३. सावरकर, वि.दा.- समग्र सावरकर खं.४, अठराशे सत्तावनचे
स्वातंत्र्यसमर, वीर सावरकर प्रकाशन,
मुंबई, १९९३, पृ.क्र. २१.

४. उक्त - पृ.क्र. ४२२

५. आ.जावडेकर श.द.- आधुनिक भारत (प्रथमावृत्ती),
कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे १९३८,पृ.क्र. ४८.

६. उक्त - पृ.क्र. १३.

७. सावरकर, वि.दा. - समग्र सावरकर खं. १ आत्मचरित्र भाग-१,
वीर सावरकर प्रकाशन, मुंबई, पृ.क्र.२८.
१९९३.

८. उक्त - पृ. क्र. २८.

९. उक्त - पृ. क्र. ३०.

१०. उक्त - पृ. क्र. ३१.

११. कीर धनंजय - स्वातंत्र्यवीर सावरकर (दुसरी आवृत्ती), पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८३, पृ.क्र.१६.

१२. उक्त - पृ. क्र. ३५.

१३. सावरकर, वि.दा. - समग्र सावरकर खं. २, आत्मचरित्र भाग-२, वीर सावरकर प्रकाशन, मुंबई, १९९३, पृ.क्र. १८.

१४. कीर, धनंजय - स्वातंत्र्यवीर सावरकर (दुसरी आवृत्ती) पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८३, पृ.क्र.२०८.

१५. उक्त - पृ.क्र. ५८०.

१६. सावरकर, वि.दा. - समग्र सावरकर खंड-१, आत्मचरित्र - नाशिक, वीर सावरकर प्रकाशन, मुंबई, १९९३, पृ. क्र. ४३.

१७. उक्त - पृ. २१.

१८. सावरकर, वि.दा. - समग्र सावरकर खं.४, अठराशे सत्तावनचे स्वातंत्र्यसमर, वीर सावरकर प्रकाशन, मुंबई, १९९३, पृ.क्र. २३.

१९. सावरकर, वि.दा. - लंडनची बातमीपत्रे (आवृत्ती सहावी), वीर सावरकर प्रकाशन, मुंबई, १९८५. पृ.क्र. ८९.

२०. सावरकर, वि.दा. - समग्र सावरकर खं.१ आत्मचरित्र भगूर, वीर सावरकर प्रकाशन, मुंबई, १९९३, पृ.क्र. ६६.

२१. सावरकर वि.दा. - समग्र सावरकर खं.१ आत्मचरित्र - शत्रूच्या शिबिरात, वीर सावरकर प्रकाशन, मुंबई, १९९३, पृ.क्र. ६८.

२२. सावरकर, वि.दा. - जोसेफ मॅझिनी - आत्मचरित्र व राजकारण, मनोरमा प्रकाशन, मुंबई, १९९२, पृ.क्र. ४०.

२३. उक्त - पृ. क्र. ४७.

२४. सावरकर, वि.दा. - समग्र सावरकर खंड १ - आत्मचरित्र पूर्वपीठिका, वीर सावरकर प्रकाशन, मुंबई, पृ. ३७.

२५. उक्त - पृ.क्र. ४७.

२६. सावरकर, वि.दा. - समग्र सावरकर खं.१ - आत्मचरित्र भगूर, वीर सावरकर प्रकाशन, मुंबई, पृ.१९९३, पृ.क्र. ५९.

२७. देशपांडे, भा.गं. - क्रांतिसूर्य सावरकर (प्रथमावृत्ती), अजय प्रकाशन, औरंगाबाद, १९७४, पृ.क्र. ८६.

२८. सावरकर, वि.दा. - समग्र सावरकर खं.१, आत्मचरित्र-शत्रूच्या शिबीरात, वीर सावरकर प्रकाशन, मुंबई, १९९३, पृ.क्र. ७७.

12559
A